Swami Vivekanand Bahuuddeshiya Samajik Sanstha's

# KUKADI VALLEY PUBLIC SCHOOL & JR.COLLEGE

(ENGLISH MEDIUM SCHOOL)

**(Affiliated to CBSE Vide Affiliation No.1130161. School Code :30186)**

At -Post-Yedgaon,Tal.Junnar, Dist.Pune - 410504, Mob.:9970014090 / 9031844747

**UDISE NO. 27250702809**

Outward no.KVPS/164/2023-24 Date : 26.02.2024

प्रति,
माननीय,शिक्षणाधिकारी साहेब, (प्राथमिक)
शिक्षण विभाग (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,
पुणे.

**विषय -:** School E-Manyata Management System या पोर्टलवर स्व-मान्यता ऑनलाईन प्रस्ताव दाखल करणे कामी संदर्भ क.1.शासन मान्यता संदर्भ क. 2.डीवायडी मान्यता व संदर्भ क. 3.प्रथम मान्यता, या तीन परवानग्यांविषयी खुलासा करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास माहिती देण्यात येते की, कुकडी व्हॅली पब्लिक स्कुल, येडगाव हे विदयालय सुरू करून त्यात सी.बी.एस.ई अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आमचे संस्थेने महाराष्ट्र शासनाकडे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज केला होता.सदर अर्जान्वये कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी दि.05.05.2006 रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी आमचे संस्थेचा माहिती अहवाल मागविला होता व त्या अनुषंगाने त्यावेळेस शासनाने आम्हांस शाळा सुरू करण्यासाठी कायमस्वरूपी ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.सदर प्रमाणपत्राचा क्रमांक.**NO. NOC (2006/311/2006)SE-1** हा आहे व त्याआधारे आम्ही जुन 2006 मध्ये कुकडी व्हॅली पब्लिक स्कुल या नावाने इंग्रजी माध्यमाची सीबीएसई बोर्डाची शाळा मु.पो.येडगाव ता.जुन्नर जि.पुणे या ठिकाणी सुरू केली.त्यावेळेस शासन ना हरकत प्रमाणपत्रा व्यतिरीक्त इतर कुठल्याही वेगळया प्रकारची परवानगी घेण्याची आवश्यकता नव्हती.

महाराष्ट्र शासनाने शाळेस दिलेल्या या ना हरकत प्रमाणपत्राच्या आधारे आम्ही केंद्रिय सी.बी.एस.ई बोर्डास शाळा सुरू करण्यासाठी अर्ज केला होता.त्या अर्जान्वये सी.बी.एस.ई बोर्डाने दि.10.06.2008 रोजी शाळेस प्रथम मान्यता क्रमांक.**1130161** देऊन शाळा सुरू करण्यासाठी आमच्या संस्थेस परवानगी दिली.

शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जिल्हा परिषद (प्राथ) पुणे यांजकडून दि.09.10.2017 रोजी संदर्भ पत्र क्र.1533/2017 अन्वये शाळा स्वमान्यता प्रमाणपत्र मिळालेले आहे.तसेच दि.24.11.2020 रोजी संदर्भ पत्र क्र.670/2020 अन्वये जिल्हा परिषद (प्राथ) पुणे यांजकडून कायम विनाअनुदानित तत्वावर पुर्नमान्यता मिळालेली आहे.

आमचे शाळेमध्ये इयत्ता 1 ली ते 12 वी पर्यंतचे वर्ग असून शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये विदयार्थी संख्या 1221 आहे.

शाळेस दि.11.08.2017 रोजी 11 वी व 12 वी चे वर्ग सुरू करण्यास सी.बी.एस.ई बोर्डाने परवानगी दिलेली आहे व त्यानंतर आम्ही शाळेचे नाव "कुकडी व्हॅली पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज" असे संबोधण्यास सुरूवात केलेली आहे.

शाळेस शासनाकडून **27250702809** हा युडायस कंमाक सुद्धा मिळालेला आहे. शाळा शासनाच्या सरल पोर्टल वर असून शाळेकडे नियमित लॉगीन उपलब्ध आहे.

सी.बी.एस.ई बोर्डाकडून वेळोवेळी शाळेस खालीलप्रमाणे शाळा सुरू ठेवण्यासाठी परवानगी प्रमाणपत्र मिळालेली आहेत.

1. No.CBSE/AFF/1130161/MS-00399-0809/133820 Dated : 10.06.2008
   (Period-01.04.2008 to 31.03.2011)
2. No.CBSE/AFF/1130161/SL-01160-1011/243461 Dated-18.06.2010
   (Period 01.04.2010 to 31.03.2013)
3. No.CBSE/AFF/1130161/EX-02263-1415/2015/900839 Dated-11.07.2015
   (Period-01.04.2013 to 31.03.2018)
4. No.CBSE/AFF/1130161/SS-01327-1718/2017/1238169 Dated-11.08.2017
   (Period- 01.04.2017 to 31.03.2020)
5. No.CBSE/AFF/EX-04133-2021/2020-21 Dated-02.09.2020
   (Period- 01.04.2020 to 31.03.2025)

महाराष्ट्र शासन आरटीई ॲक्ट 2009 हा सन 2009 पासून लागू झाला असून आमची शाळा सन 2006 साली सुरू झाली म्हणजे हा ॲक्ट लागू होण्यापुर्वी सुरू झाली आहे. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार शासकिय पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने निवड झालेल्या विदयार्थ्यांना 25 टक्के राखीव जागेवर शासन नियमानुसार सन 2015-16 सालापासून आमची शाळा नियमित प्रवेश देत आहे.

आरटीई ॲक्ट 2009 /महाराष्ट्र शासन ॲक्ट 2011 मधील तरतुदींचे वेळोवेळी शाळा नियमित पालन करत आहे व भविष्यात सुध्दा आमची शाळा शासकिय नियमांचे पालन करत राहील. शाळा विदयार्थ्यांना गुणवत्ता पुर्ण शिक्षण देत आहे. तसेच संगणकीय शिक्षणावर भर देऊन आमची शाळा विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करत राहील. आमची शाळा कोणत्याही अवैध्य कृत्यामध्ये सहभागी नसून आम्ही नेहमीच दर्जेदार व अत्याधुनिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करत राहू.

तरी School E-Manyata Management System या पोर्टलवर स्व-मान्यता ऑनलाईन प्रस्ताव दाखल करताना आमच्या कडे उपलब्ध नसलेल्या या तीन परवानग्यांविषयीचा खुलासा आपण मान्य करावा व आम्हांस स्वमान्यता प्रमाणपत्र दयावे ही नम्र विनंती.

आपली विश्वासु
PRINCIPAL
Kukadi Valley Public School & Jr.College
मुख्याध्यापिका / व्यवस्थापक
A/P.Yedgaon, Tal.Junnar,(Pune).410504

PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE • Yedgaon,(Pune) • KUKADI VALLEY
Aff.No.
School Code
30186